ISSN 2278-3954 Saptahik Nagara

साप्ताहिक नगारा

संस्थापक संपादक : दलितमित्र स्व. गोविंदराव गोरवाडकर

R.N.I. No. 16746/67 पोष्टाचा परवाना क्र. एम.जी.एन.३९/२०१८-२०२०

श्री. _____

पत्ता _____

_____

वरील पत्त्यावर अंक न पोहोचल्यास परत पाठविण्याचा पत्ता : मा. संपादक सा. नगारा, ८५२, गोरवाडकर वाडा, मालेगांव कँम्प (नाशिक)

NAGARA WEEKLY

* मंगळवार दि. ८ ऑक्टोबर २०१९



धिंड

।। मुक्तक ।।
प्रा.सुरेश भिलकोटकर
मो. : ९४२१६०९४३७
(लेखक मुक्त विद्यापीठात प्राध्यापक आहेत.)

आमच्या लहानपणी प्रत्येक हंगामात आम्हाला काहीतरी खेळाचा नाद लागत असे. विटीदांडू, भवरे, गोट्या, कवड्या, कबड्डी, खो-खो, टकटक घोडी, सूरपारंब्या, भिंगरी, चकारी, बैलगाडी, लपाछपी, आबाधबी, भुगली-भुगली असे सारे ते मैदानी खेळ असत. ''सोबतच चौपट, पत्ते, भांडी भांडी, अभ्यास अभ्यास असे बैठे खेळही आम्ही खेळत असू. हंगाम आणि महिना बदलला की खेळ बदलत असे.

पावसाळ्यात आम्हाला पोहायचा नाद असे. कान्होळी नदीला पूर आला की आमची पोळी पिकायची! त्यावेळी दोन सत्रात शाळा भरायची. मधला अकरा ते दोन वेळ आम्हा मुलांना मोकळा मिळायचा. जेवढा पूर मोठा.. तेवढी पोहायची मजा मोठी! कान्होळी नदीच्या प्रत्येक डोहाला मोठमोठी धपाडे होती. जेवढे पुराचे पाणी जास्त तेवढ्या मोठ्या धपाडावरुन उड्या आम्ही नदीत मारीत असू. पावसाळ्यात मधला संपूर्ण वेळ आम्ही नदीवरच असायचो. अनेकदा शाळा भरुन गेल्याचेही भान नसायचे. अनेकदा वर्गात संख्या कमी दिसामची. अशा वेळी शिक्षकांचा मोर्चा नदीकडे वळायचा. यात देसाई गुरुजी पुढे असायचे. पोहणाऱ्या सर्व मुलांचे कपडे ते उचलून शाळेत घेवून यायचे. मुलांची मोठी पंचाईत व्हायची. पोरांचे पोहणे म्हणजे अंगावर एकही कपडा नसायचा.

एके दिवशी असेच झाले. नदीला मोठा पूर आला होता. पोहताना आम्हा मुलांना वेळेचे भान राहिले नाही. खूपवेळ पोहत राहिलो. तिकडे दुपारच्या शाळेची घंटा झाली. त्याचे भान कोणालाही नव्हते. देसाई गुरुजी नदीवर आले. सगळ्या मुलांचे कपडे गोळा केले. शांतपणे शाळेकडे निघाले. नदीकडून गावांकडे जाणाऱ्या घटाडीवर ते कपड्यांसह चढतांना कोणीतरी पाहिले. नि ओरडले, ''अरे गुरुजी आपला कपडा उचली लई चला!

सगळ्यांच्या नजरा घटाडी चढणाऱ्या गुरुजींकडे वळल्या. विजेच्या चपळाईने सर्व एकत्र आले. दहा-बारा जणांचा आमचा घोळका होता सर्वजण एकदम नंगेबंब! गावात कसे शिरायचे हा प्रश्न आ वासून उभा राहिला. शाळेत जायलाही उशीर झाला होता नि अंगावर घालायला कपडेही नव्हते. ही बातमी हाऽऽ हाऽऽ म्हणता गावभर पसरली. घरांतून पालकांच्या आम्हाला लाखोल्या सुरू झाल्या.. आता घरात तरी कसे शिरायचे.. हा प्रश्न निर्माण झाला होता. आम्ही पाण्यातून बाहेर आलो. कोणी शाळेतल्या पोरी नाहीत ना.. याची खात्री करीत हळूहळू पुढे सरकू लागलो.. गनिमी काव्याने आपापल्या घरांकडे सरकू लागलो.. तशी आमच्या गावाभोवती दरी-दगड-धोंडे यांची कमी नव्हती.. आजही नाही! त्यांची मोठीच मदत आम्हाला झाली. मोठमोठे दगड, झाडे, झुडपे, तरोटे, गुरे-ढोरे, खळे, वडांगा याचा आधार घेत आम्ही आपापल्या घरी पोचलो. मी घरी पोचलो नि दारामागे लपलो. योगायोगाने त्या दिवशी आई घरीत होती. त्यामुळे खूप शिव्या खाल्या.

गुरुजींनी एक मात्र चांगले केले होते. प्रत्येकाचे कपडे ज्याच्या त्याच्या घरी पोचते केले होते. देसाई गुरुजी होतेच तसे मवाळ. त्यांना आमची खोड जिरवायची होती. त्यासाठी त्यांनी आमची चांगलीच धिंड काढली होती.

।। श्री स्वामी समर्थ ।।
सोने चांदीचे दागिने तसेच सर्व प्रकारचे राशींचे रियल खडे व नवग्रह अंगठी मिळतील.

राजधर बंधू सराफ
शिवाजी रोड, सावरकर चौक, मातृपितृ अपार्टमेंट
मालेगांव कॅम्प (नाशिक)
फोन : 02554- 254056 /9657264615

अरविंद आईस्क्रीम
* व्हॅनिला * स्ट्रॉबेरी * पायनापल आदी स्वादांमध्ये आईस्क्रीम
* लग्न समारंभाच्या ऑर्डर स्विकारल्या जातील.
* कोल्ड्रींक्स दुकानदारांसाठी होलसेल भावात आईस्क्रीम
मुख्य शाखा : अरविंद आईस्क्रीम, बोरसे नगर, प्लॉट नं. २८, सटाणा नाका, मालेगांव
शाखा : आशिर्वाद स्वीटस् ॲण्ड कोल्ड्रींक्स्, कापसे गल्ली, मालेगांव (नाशिक)
मोबाईल : 9822186585